# उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम योजना

सदरची योजना राज्यशासनाची योजना असून राज्यातील अनुसुचित जातीच्या सुशिक्षित बेरोजगारांना राज्यशासनाने पुरस्कृत केलेल्या मिटकॉन कन्सल्टन्सी सर्विसेस लि.,/महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, या मान्यताप्राप्त संस्थामार्फत उद्योजकता प्रशिक्षणाचे काम करण्यात येते.

## योजनेचा उध्देश

अनुसुचित जातीच्या सुशिक्षित बेरोजगारांना उद्योजकता विकास आणि तांत्रीक प्रशिक्षण देवून स्वयंरोजगारासाठी त्यांची तयारी करणे.

## प्रशिक्षण देणारी संस्था

१.मिटकॉन कन्सल्टन्सी सर्विसेस लि.,

२.महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र.

३.शासनाने मान्यता दिलेली अन्य सक्षम प्रशिक्षण संस्था

(प्रशिक्षण देणारी संस्था किमान ५ वर्षापासून राज्यात उद्योजकता विकास प्रशिक्षणाचे क्षेत्रात काम करणारी मान्यता प्राप्त असावी. संस्थमध्ये उद्योजकता प्रशिक्षण क्षेत्रातील केंद्र शासनाने मान्यता दिलेल्या संस्थेमधून प्रशिक्षण घेतलेले प्रेरक प्रशिक्षक असावेत व त्यांचेकडे प्रशिक्षण देणेकरीता आवश्यक त्या सुविधा असाव्यात.)

## अंमलबजावणी यंत्रणा

१.महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र,

२.योजनेअंतर्गत इच्छुक प्रशिक्षणार्थिची निवड आणि पाठपुरावा करण्याकरीता जिल्हास्तरीय समिती.

## कार्यपध्दती

सदर योजनेअंतर्गत प्राप्त झालेल्या अर्जांची निवड करण्यासाठी खालीलप्रमाणे एक कार्यबल समिती असे.

१.महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र----------------------------अध्यक्ष
२.जिल्हा समाजकल्याण अधिकारी-----------------------------उपाध्यक्ष
३.जिल्हयातील अग्रणी बँकेचे प्रतिनिधी----------------------------सदस्य
४.प्रकल्प अधिकारी, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, ------------निमंत्रक
५.मिटकॉन किंवा शासनमान्य प्रशिक्षण संस्था-------------------निमंत्रक

*सदर कार्यबल समिती, लाभार्थि उद्योग, व्यवसाय उभारणेसाठी कर्ज/अनुदान मिळणेकरीता कोणत्या योजनेत पात्र आहे याबाबत मार्गदर्शन करेल.

*प्रशिक्षणार्थिंना प्रकल्प उभारणीकरीता कार्यबल समितीचे घटक संयुक्तपणे प्रयत्न करतील.

*मिटकॉन कन्सल्टन्सी सर्विसेस लि., महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, व अन्य मान्यता प्राप्त संस्थांनी कार्यबल समितीने ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करावेत. प्रशिक्षण संस्थेने स्थानिक वर्तमान पत्रातून तसेच जिल्हा जिल्हा रोजगार स्वयंरोजगार मार्गदर्शन कार्यालय व जिल्हा समाजकल्याण कार्यालामध्ये उपलब्ध असलेल्या यादीतून प्रशिक्षणार्थिंचे अर्ज मागवावेत. एक दिवसाचे उद्योजकतेबाबत जागृती मेळावे घेवून अर्ज प्राप्त करता येवू शकतील. प्रशिक्षण मुलाखती करीता व प्रशिक्षणाकरीता येणा-या कोणत्याहि प्रकारचा प्रवास, दैनिक भत्ता देय नाही.

*उमेदवाराची निवड करताना कार्यबल समिती महिलांना प्राधान्य देईल.

*प्रशिक्षण कार्यक्रमाचे नियोजन, समन्वय व पाठपुरावा संबंधित प्रशिक्षण संस्था करतील.

## लाभार्थिची पात्रता

*उमेदवार जिल्हयातील अनुसुचित जातीचा असावा.

*उमेदवार किमान ७ वी पास, किंवा पदवी, पदवीका, आयटिआय प्रमाणपत्र किंवा किमान कौशल्यावर आधारित व्यावसायीक अभ्यासक्रम प्रमाणपत्र धारक असावा.

*उमेदवाराचे वय १८ ते ५० असावे.

*उमेदवार कोणत्याहि संस्थेचा थकबाकीदार नसावा.

## योजनेअंतर्गत प्रशिक्षण कार्यक्रम खालीलप्रमाणे असतील.

१. **उद्योजकता परिचय कार्यक्रम..(१ दिवस, अनिवासी)**

एक दिवसाच्या परिचय कार्यक्रमांतर्गत व्यवसायाची निवड, उद्योजकीय व्यक्तीमत्व विकास, व्यवसाय व्यवस्थापन, शासनाच्या विविध संस्था व अर्थसहाय्य देणा-या संस्था व त्यांचे मार्फत राबविल्या जाणा-या योजनांची माहिती ,बाजारपेठ पहाणीबाबत सर्वसामान्य माहिती इत्यादिचा समावेश राहिल.

प्रति कार्यक्रम रु.६००/- इतका खर्च प्रशिक्षक संस्थेस करता येईल.

२. **उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम (१२ दिवस, निवासी)**

छोटया उद्योजकास, उद्योग व व्यवसाय उभारताना अनेक प्रकारच्या अडचणी भेडसावतात त्यावर मात करण्याकरीता प्रशिक्षणाद्वारे माहिती अगोदर मिळाल्यास तो उद्योग/व्यवसाय उभारण्यास सक्षम होईल. प्रशिक्षणाच्या आर्थिक व तांत्रिक बाबींचा विचार करुन प्रशिक्षण १२ दिवसाचे निवासी/नाश्ता/चहा व भोजन व्यवस्थेसह असेल. यासाठी प्रति प्रशिक्षणार्थि रु.४०००/-या कमाल मर्यादेपर्यन्त रक्कम प्रशिक्षण संस्थेस अनुज्ञेय राहिल.

निवासी कार्यक्रमाच्या अनुषंगाने निवडलेल्या प्रशिक्षणार्थिंना खालीलप्रमाणे उद्योगाशी संबंधित कला गुणांचा विकास व माहिती मिळण्याचा प्रशिक्षणात प्रामुख्याने समावेश करण्याची जबाबदारी प्रशिक्षण संस्थेवर असेल.

* **प्रशिक्षणाचे विषय**

♠उद्योजकतेकरीता आवश्यक असलेले गुण व उद्योजकीय व्यक्तिमत्व विकास

♠अर्थ सहाय्य देणा-या विविध संस्था व त्यांचे अर्थसहाय्य मिळण्याकरीता कार्यप्रणाली

♠मागणी/बाजारपेठ सर्वेक्षण कसे करावे

♠विविध उद्योगांमध्ये उपलब्ध असलेल्या संधी

♠व्यवसायाशी संबंधित कायदे व त्याकरीता अवलंबविण्याची कार्यपध्दती

♠व्यवसाय उभारणीस येणा-या अडचणी व त्यांचे निराकरण कसे करावे

♠हिशेब व इतर लेखा विषयक बाबी

♠पणन व्यवस्थापन

♠उद्योगांना प्रत्यक्ष भेटी व उद्योजकांचे अनुभव

♠प्रकल्प अहवाल तयार करणे व त्यांचे विश्लेषण

♠आवश्यकतेनुसार इतर विषय

३. **तात्रिक प्रशिक्षण कार्यक्रम (१५ दिवस ते २ महिने, अनिवासी)**

- या प्रशिक्षणात उत्पादन/सेवा उद्योगांशी निगडीत असलेल्या प्रकारामध्ये तांत्रिक कौशल्य वाढविणे, नविन माहिती देणे इत्यादिंचा अंतर्भाव असेल. लाभार्थ्यांना स्वतंत्रपणे तो व्यवसाय करणेकरीता आत्मविश्वास प्राप्त होईल इतपत प्रात्यक्षिके व प्रत्यक्ष कामाचा अनुभव प्रशिक्षणार्थिंना मिळण्याचेदृष्टीने प्रशिक्षणाचे स्वरुप ठेवण्यात येईल.

- खालील व्यवसायांचा मुख्यत: तांत्रिक शिक्षण व उद्योजकतेच्या प्रशिक्षणात समावेश राहिल.

♠फॅशन डिझायनिंग व विणकाम

♠बेकरी

♠दुचाकी वाहन दुरुस्ती

♠फोटोग्राफी आणि व्हीडिओ शुटिंग

♠टाय ॲण्ड डाय, बटिक पेंन्टींग

♠बंदिस्त शेळी पालन

| | |
|---|---|
| ♠शिवणकाम | ♠ब्युटिपार्लर |
| ♠डिटिपी आणि स्क्रीन प्रिन्टींग | ♠फळप्रक्रिया |
| ♠संगणक जोडणी, दुरुस्ती व देखभाल | ♠नर्सरी व्यवस्थापन |
| ♠आयुर्वेदिक वनस्पती लागवड व प्रक्रिया | ♠घरगुती उपकरणे दुरुस्ती व देखभाल |
| ♠मल्टी परपज मॅकेनिक | ♠कॅटरिंग व इतर व्यवसाय |

इतर उद्योग/सेवा उद्योग (कार्यबल समिती ठरवून देईल त्याप्रमाणे)

*प्रशिक्षण अनिवासी असेल. संस्था प्रशिक्षणार्थिस दरमहा रु.१०००/-विद्यावेतन देईल.(म्हणजेच १५ दिवसांचे कार्यक्रमासाठी त्यांना रु.५००/- व दोन महिन्यांचे कार्यक्रमासाठी रु.२०००/- अदा करण्यात येईल)

*प्रशिक्षण संस्थेस प्रति प्रशिक्षणार्थि रु.३०००/- विद्यावेतनासहीत प्रति महा अदा करता येईल.

*महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, हे योजनेवर नियंत्रण ठेवतील.

*उद्योजकता विकास प्रशिक्षण व तांत्रिक कौशल्य विकास प्रशिक्षणात एकाच वेळेस जास्तीत जास्त ३० प्रशिक्षणार्थि घ्यावेत.

=X=X=X=X=X=X=